MHRG040038992023

# विशेष दिवाणी दावा क्र. ४२१/२०२३

सुरेश वाकवाणी ...वादी
विरूध्द
भालचंद्र ठाकूर तर्फे वारस ...प्रतिवादी

## निशाणी क्र. ५१ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) प्रमाणे दावा फेटाळणेसाठी प्रतिवादी क्र.६ यांनी सादर केला आहे.

२) अर्ज, वादीचे म्हणणे निशाणी ५५, दावा वाचला. वादी व प्रतिवादी क्र.६ यांचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

३) अर्ज कथन थोडक्यात असे आहे की, प्रस्तुत दावा दिनांक २२/१२/२०१० रोजीचे कराराची विशेष पुर्तता व अन्य विनंती याकरिता दाखल केला आहे. वादी यांनी सदर दावा दिनांक २२/१२/२०१० पासून तीन वर्षे मुदतीत दाखल केलेला नाही. त्यामुळे सदर दावा मुदतबाहय आहे. तसेच, वादी यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९-अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१) मधील तरतुदीप्रमाणे प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना दिनांक ३०/०३/२०२३ व दिनांक ०६/०४/२०२३ रोजी नोटीसा पाठविल्याचे कथन केले आहे. परंतु, वादी यांनी सिडको अधिकारी यांचेविरुध्द सदर नोटीस पाठविल्याचे दिनांकापासून, प्रथम अनुसची मधील कलम ९(१)(ब) मधील तरतुदीप्रमाणे सहा महिने मुदतीत म्हणजेच दिनांक ३०/०९/२०२३ किंवा दिनांक ०६/१०/२०२३ पर्यंत दावा दाखल केलेला नाही. त्यामुळे सदर दावा मुदतबाहय झाला आहे. सदर दावा दिनांक २७/११/२०२३ रोजी दाखल केला आहे व दिनांक २८/१२/२०२३ रोजी नोंदविण्यात आला आहे. दावा मुदतबाहय असल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) तरतुदीप्रमाणे दावा

फेटाळणे यावा अशी विनंती केली आहे.

४) वादीने निशाणी ५५ वर अर्जास म्हणणे सादर केले आहे. अर्ज कथन नाकारले आहे. दावा दाखल करणेस कारण एप्रिल २०२१ मध्ये घडलेले आहे. मुदत अधिनियम आर्टिकल ५६ प्रमाणे दावा तीन वर्षे मुदतीत दाखल केला आहे. वादीने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१) मधील तरतुदीची पुर्तता केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.६ यांचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

५) विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावर निष्कर्ष व कारणमीमांसा नोंदवित आहे.

| अ.क्र. | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १ | दावा कथनावरुन दावा मुदत अधिनियम आर्टिकल ५४ तरतुदीप्रमाणे मुदतबाहय आहे असे दिसते का? | ... नाही. |
| २ | दावा कथनावरुन दावा महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९-अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१)(अ) व (ब) मधील तरतुदीप्रमाणे सिडको अधिकारी यांना पाठविलेली नोटीस या अनुषंगाने दावा मुदतबाहय आहे असे दिसते का? | ... नाही. |
| ३ | आदेश काय ? | ...अर्ज नामंजूर करण्यात आला. |

## :: <u>कारणमीमांसा</u> ::

६) दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्जाचा विचार करतांना केवळ दावा कथन व वादी विसंबून असलेले कागदपत्र हेच तपासणी करता येतात. प्रतिवादीची कैफियत, बचाव व कागदपत्र तसेच सदर अर्जातील मजकूर याचा विचार करता येत नाही. सदर अर्जाचा विचार करतांना प्रकरणांतील गुणदोष तपासणी करता येत नाही. उभयपक्षाने पुराव्याअंती निर्णीत करावयाचे

वादप्रश्न असल्यास दावा फेटाळता येत नाही. तथापि, दावा कथनावरून कोणत्याही कायदेशीर तरतुदीद्वारे दावा बाधीत आहे किंवा दावा कारण घडलेले नाही असे दिसत असल्यास दावा फेटाळणे क्रमप्राप्त आहे.

## <u>मुद्दा क्रमांक १ करीता</u> :-

७) प्रतिवादी क्र.६ यांचा आक्षेप असा आहे की, प्रस्तुत दावा दिनांक २२/१२/२०१० रोजीचे कथित कराराची विशेष पुर्तता अनुतोष व इतर विनंतीसाठी दाखल केला आहे. वादीने प्रस्तुत दावा दिनांक २२/१२/२०१० पासून तीन वर्षे मुदतीत दाखल केलेला नाही. त्यामुळे दावा मुदतबाहय आहे.

८) वादीने प्रतिवादीचे आक्षेप नाकारलेले आहेत. दावा दाखल करणेस कारण एप्रिल २०२१ मध्ये घडले व त्यानंतर मुदतीत दावा दाखल केला आहे.

९) संपूर्ण दावा कथन व दिनांक २२/१२/२०१० रोजीचे समजोता करार वाचला. प्रस्तुत प्रकरणात मुदतीचा वादप्रश्न हा तथ्य व कायदा यावर आधारीत संमिश्र वादप्रश्न आहे. वादी व प्रतिवादी यांचा पुरावा नोंदविल्यानंतर प्रस्तुत दावा मुदत अधिनियम आर्टिकल ५४ प्रमाणे मुदतबाहय आहे किंवा नाही हे निर्णित होईल. मुदत अधिनियम आर्टिकल ५४ प्रमाणे कराराची पुर्तता करणेची दिनांक निश्चित असल्यास सदर दिनांकापासून तीन वर्षे मुदत मर्यादा आहे किंवा करार पुर्तता करणेची दिनांक निश्चित नसल्यास करार पुर्तता करणेचे नाकारण्याचे वादीस माहिती/नोटीस दिनांकापासून तीन वर्षे मुदत मर्यादा आहे. प्रस्तत दाव्यात दिनांक २२/१२/२०१० रोजीचे कराराची पुर्ततेचा निश्चित दिनांक नमूद नाही. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा भुखंड दिनांक २३/०४/२०२१ रोजी प्रतिवादी क्र. ६ चे लाभात त्रिपक्षीय कराराने हस्तांतरित केल्याचे कागदपत्र वादीस माहिती अधिकार अधिनियमाप्रमाणे अर्जानुसार मिळाले. त्यामुळे दावा दाखल करणेस एप्रिल २०२१ मध्ये कारण घडले आहे. दावा कथनावरुन प्रस्तुत दावा मुदत अधिनियम आर्टिकल ५४ प्रमाणे मुदतबाहय आहे असे दिसत नाही. करिता मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करीता</u>** :-

१०) प्रतिवादी क्र.६ चा आक्षेप असा आहे की, वादी यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१) मधील तरतुदीप्रमाणे प्रतिवादी क्र.४ व ५ यांना दिनांक ३०/०३/२०२३ व दिनांक ०६/०४/२०२३ रोजी नोटीसा पाठविल्याचे कथन केले आहे. परंतु, वादी यांनी सिडको अधिकारी यांचेविरुध्द सदर नोटीस पाठविल्याचे दिनांकापासून, प्रथम अनुसची मधील कलम ९(१)(ब) मधील तरतुदीप्रमाणे सहा महिने मुदतीत म्हणजेच दिनांक ३०/०९/२०२३ किंवा दिनांक ०६/१०/२०२३ पर्यंत दावा दाखल केलेला नाही. त्यामुळे सदर दावा मुदतबाहय झाला आहे. सदर दावा दिनांक २७/११/२०२३ रोजी दाखल केला आहे व दिनांक २८/१२/२०२३ रोजी नोंदविण्यात आला आहे. दावा मुदतबाहय असल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) तरतुदीप्रमाणे दावा फेटाळणे यावा अशी विनंती केली आहे.

११) प्रतिवादी क्र.६ चे विद्वान वकिल श्री.एस.एस. उरणकर यांनी युक्तिवाद केला की, प्रकरणातील प्रतिवादी क्र.४ व ५ हे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे कार्यरत असलेले सिडको अधिकारी आहेत. त्यांचेविरुध्द दावा दाखल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१)(अ) मधील तरतुदीप्रमाणे प्रतिवादी क्र.४ व ५ यांना दिनांक ३०/०३/२०२३, दिनांक ०६/०४/२०२३ व दिनांक १३/०४/२०२३ रोजी वादीने नोटीस दिली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१)(ब) मधील तरतुदीप्रमाणे नोटीस दिनांकापासून सहा महिने कालावधीत म्हणजेच दिनांक १३/१०/२०२३ पर्यंत वादीने दावा दाखल करणे आवश्यक आहे. परंतु, वादीने प्रस्तुत दावा दिनांक ०६/११/२०२३ रोजी दाखल केला आहे. वादीने दाखल केलेले कागदपत्र, नोटीस दिनांक व दावा दाखल दिनांक यावरुन सदर दावा महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९-अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१)(अ) व (ब) मधील तरतुदीचे उल्लंघन होत आहे व

मुदतबाहय आहे. त्यामुळे दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) प्रमाणे फेटाळण्यात यावा.

१२) वादीचे विद्वान वकिलांनी युक्तिवाद केला की, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१)(अ) प्रमाणे वादीने प्रतिवादी क्र.४ व ५ सिडको यांना नोटीस पाठविली आहे व सदर अधिनियामाचे तरतुदीची पुर्तता केली आहे. प्रतिवादीचे वकिलांनी घेतलेला आक्षेप चुकीचा आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

१३) वादी व प्रतिवादी क्र.६ यांचे विद्वान वकिलांचा युक्तिवाद विचारात घेतला. प्रतिवादी क्र.६ चे विद्वान वकिलांचा युक्तिवादाचा अर्थ असा आहे की, वादीने प्रतिवादी क्र.४ व ५ सिडको यांना नोटीस दिलेली आहे. सदर अधिनियमाचे कलम ९(१)(अ) प्रमाणे नोटीस दिल्यापासून दोन महिने मुदतीनंतर दावा दाखल करता येतो, परंतु कलम ९(१)(ब) प्रमाणे नोटीस दिनांकापासून सहा महिने मुदतीत दावा दाखल करणे आवश्यक आहे.

१४) प्रतिवादी क्र.६ चे विद्वान वकिलांचा वरील युक्तिवाद व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१)(अ) व (ब) प्रमाणे नोटीस मुदत कालावधी याबाबत आक्षेप व युक्तिवादात कोणताही साधार नाही. सदर अधिनियमाचे कलम ९(१)(अ) व (ब) खालीप्रमाणे नमूद करीत आहे.

> *"कलम ९(१) या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या किंवा अभिप्रेत अंमलबजावणीच्या अनुषंगाने केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृत्याच्या संबंधात किंवा या अधिनियमाच्या अंमलबजावणीत केलेल्या कोणत्याही अभिकथित हयगयीच्या किंवा कसुरीच्या संबंधात संबंधित प्राधिकरणाविरुध्द किंवा त्या संबंधित प्राधिकरणाच्या आदेशांनुसार कार्य करणा-या त्याच्या कोणत्याही अधिका-याविरुध्द किंवा कर्मचा-याविरुध्द किंवा कोणत्याही व्यक्तीविरुध्द -*

*(अ) खटल्याचे कारण आणि इच्छुक वादीचे आणि अशा वादाच्या प्रयोजनार्थ, त्याच्या न्यायप्रतिनीधीचे किंवा अभिकर्त्याचे, कोणताही असल्यास नाव आणि राहण्याचे ठिकाण आणि तो मागत असलेला अनुतोष या गोष्टी वाजवी नेमकेपणाने नमूद केलेली लेखी नोटीस संबंधित प्राधिकरणास देण्यात आल्यापासून दोन महिन्यांची मुदत संपेपर्यंत ; तसेच*

***(ब) न्याय कारण उद्भवल्यानंतर सहा महिन्यांच्या आत अशा वादास प्रारंभ झाला असल्याखेरीज ;***

*कोणताही वाद दाखल करण्यात येणार नाही.''*

*"Section 9 (1) No suit shall be instituted against the relevant authority or against any officer or servant thereof or any person acting under the orders of the relevant authority, in respect of any act done or purporting to have been done, in pursuance of execution or intended execution of this Act or in respect of any alleged neglect or default in the executionof this Act,—*

*(a) until the expiration of two months next after notice in writing has been given to the relevant authority stating with reasonable particularity the cause of action and the name and place of residence of the intending plaintiff and of his attorney or agent, if any, for the purpose of such suit and the relief which he claims ; or*

***(b) unless it is commenced within six months next after the accrual of the cause of action."***

१५) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१)(अ) व (ब) याचे काळजीपूर्वक वाचन केले असता

कलम ९(१)(ब) याचा अर्थ असा आहे की, सिडको व त्याचे अधिकारी यांचेविरुध्द दावा दाखल करणेस कारण घडले दिनांकापासून सहा महिने कालावधीत दावा दाखल केल्यास सदर कलम ९(१) यातील तरतुदीची बाधा येत नाही व सदर कलम ९(१)(अ) तरतुदीप्रमाणे नोटीस देणेची आवश्यकता नाही.

१६) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१)(अ) व (ब) याचे काळजीपूर्वक वाचन केले असता कलम ९(१)(अ) याचा अर्थ असा आहे की, सिडको किंवा त्याचे अधिकारी यांचेविरुध्द दावा दाखल करणेपूर्वी नोटीस देणे व सदर नोटीस दिलेपासून दोन महिने कालावधी संपलेनंतर दावा दाखल करणे.

१७) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१)(अ) व (ब) या तरतुदी एकत्रितपणे व काळजीपूर्वक वाचले असता कलम ९(१)(ब) प्रमाणे दावा दाखल करणेस कारण घडले दिनांकापासून सहा महिने कालावधीत दावा दाखल केल्यास सदर अधिनियमाचे कलम ९(१)(अ) लागू होत नाही व सहा महिने कालावधीनंतर दावा दाखल केल्यास सदर अधिनियमाचे कलम ९(१)(अ) हे लागू होते, म्हणजेच सिडको अधिकारी यांना नोटीस देणे व नोटीस दिलेपासून दोन महिने कालावधी संपलेनंतर दावा दाखल करणे. याचा अर्थ असा होत नाही की, नोटीस दिनांकापासून सहा महिने कालावधीत दावा दाखल केला पाहिजे. याउलट, मुदत अधिनियमाचे कलम १५(२) चे तरतुदीप्रमाणे सदर दोन महिन्यांचा कालावधी मुदत मर्यादा मोजताना कमी करता येते.

१८) दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० यामधील शासन किंवा शासनाचे अधिकारी यांचेविरुध्द दावा दाखल करणेपूर्वी नोटीस देणे व नोटीस दिनांकापासून दोन महिने कालावधी संपलेनंतर दावा दाखल करणेची तरतूद आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८०(२) तरतुदीप्रमाणे तातडीचे व तात्काळ विनंतीसाठी दावा दाखल करायचा असल्यास न्यायालयाची परवानगी घेवून नोटीस न देता दावा दाखल करता येतो.

१९) दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८०(२) प्रमाणे तरतूद महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१)(अ) व (ब) यामध्ये नाही. परंतु, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१)(ब) याचा अर्थ स्पष्ट आहे की, दावा दाखल करणेस कारण घडलेपासून सहा महिनेचे कालावधीत दावा दाखल केल्यास नोटीस आवश्यकता नाही. तात्काळ व तातडीचा दावा असल्यास निश्चितच सहा महिने कालावधीत दाखल होईल. त्यामुळे असा दावा दाखल करणेस नोटीसीची आवश्यकता नाही. परंतु, दावा दाखल करणेस कारण घ डलेपासून सहा महिनेचा कालवधीनंतर दाखल केलेला दावा यास महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम १५९-अ व प्रथम अनुसुची यातील कलम ९(१)(अ) प्रमाणे नोटीस आवश्यक व गरजेची आहे. अशी नोटीस दिलेली नसल्यास दावा निश्चितपणे बाधीत होईल.

२०) वरील विवेचनावरुन, प्रस्तुत दावा नोटीस दिनांक ३०/०३/२०२३, ०६/०४/२०२३ व दिनांक १३/०४/२०२३ पासून सहा महिने कालावधीत दाखल केला नाही या कारणास्तव दावा मुदतबाहय आहे असे दिसत नाही. याप्रमाणे मुद्दा क्र.२ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## :: <u>आदेश</u> ::

१) निशाणी ५१ अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

सही/-

पनवेल,
दिनांक : ०४-०९-२०२४.

(कृ. मु. सोनवणे)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर,
पनवेल.